जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४१३ दिनांक - ०७/०६/२०२३**

**लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## दरोडा टाकणा-या सराईत चंदन चोरांना केले जेरबंद

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी जबरी चोरीचे दाखल गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने तपास पथकातील सपोनि रविंद्र गोडसे व पोलीस स्टाफ असे पोलीस ठाणेस हजर असताना पोलीस अंमलदार रोकडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी प्राप्त झाली की, एक सिल्व्हर रंगाची कार ही संशयित असुन त्यामध्ये चार ते पाच इसम असुन ते वाघोली मार्गे अहमदनगरच्या दिशेने जात आहे.

सपोनि गोडसे व स्टाफ यांनी लोणीकंद पोलीस स्टेशन समोर अहमदनगर रोडवर वरील संशयित कार ताब्यात व त्यामधील ०३ आरोपी व चंदन चोरीचा माल शिताफीने ताब्यात घेवुन आरोपींकडे अधिक तपास केला असता नमुद आरोपी हे सराईत चंदनचोर असुन त्यांनी बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गुन्हा रजिस्टर नंबर १७२/२०२३,भादंवि कलम ३९५,३४ हा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले.तसेच आरोपींकडे अधिक तपास केला असता त्यांनी यापुर्वी कोरेगाव पार्क परिसरात देखिल चंदन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली असुन नमुद आरोपींना त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या मुद्देमालासह गुन्हयाचे पुढील तपास कामी बंडगार्डन पोलीस ठाणे,पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर,श्री.शशीकांत बोराटे मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे शहर,श्री.किशार जाधव,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर,श्री.गजानन पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.मारुती पाटील, तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे,पोलीस अमंलदार बाळासाहेब सकाटे,विनायक साळवे,अजित फरांदे,कैलास साळुंके,सागर जगताप,स्वप्निल जाधव,अमोल ढोणे,साई रोकडे, पांडुरंग माने,आशिष लोहार,मल्हारी सपुरे,सचिन चव्हाण यांनी केली आहे.

